# राशिभविष्य - सप्टेंबर, २०१९.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==============================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींचा स्वभाव सध्या अतिशय अस्थिर, लहरी, चंचल असा झाला असावा, असे वाटते. तसे असेल तर कोणी चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या , तर अपमान झाल्यासारखे वाटत असेल. वडील मंडळींचा धाक, दडपण असह्य होत असेल. या राशीची लहान मुले तर अतिशय खोडकर झाली असावी, असे वाटते. असे असले तरी हा हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होणे शक्य आहे. या राशीच्या तृतीय स्थानी असलेला राहूही अनुकुल असून तो हातून कर्तृत्व घडवू शकेल. पण तो बंधुसुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. या राशीच्या[ पंचम स्थानी असलेले रवि -मंगळ ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असून आरोग्यविघातक आहेत. शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकाराचे आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत प्रतिकुल परिस्थितीशी मुकाबला करावा लागेल. वरिष्ठ अधिकाऱ्याचा जाच सहन करावा लागेल. विविध कारणांनी संतति विषयक समस्या त्रस्त करतील. काही मंडळींना प्रिय जनांपैकी कोणाचे दूरत्व निर्माण झाले तर अस्वस्थता, बेचैन अवस्था निर्माण होईल. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह नोकरीव्यवसायास पूरक होईल व हितशत्रू पराभूत होतील. मंगळ ग्रह अनारोग्यकारकच असून शारीरिक उष्णता भडकून ताप येणे, अंगावर फोड येणे, इजा होणे, अपप्रचाराचा त्रास होणे, आर्थिक नुकसान होणे, हृदयविकार बळावणे, चोरी होणे अशापैकी अनारोग्य व मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. बुध ग्रह अनुकुल होईल; व अपेक्षित कार्यसिद्धी होईल. पण शुक्र प्रतिकुल असल्याने उच्च गुणवत्ता व कर्तृत्व असूनही कर्तृत्व सिद्ध करण्यास संधीच मिळणार नाही. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा धनलाभ होऊ शकेल. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला शनि ग्रह प्रतिकुल होणार नाही पण त्याच्यासह असलेल्या केतूमुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. शिवाय काही मंडळींकडून "वरून कीर्तन आतून तमाशा " अशा प्रकारचे ढोंगी आचरण होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या नेपच्यून ग्रहामुळे अर्थप्राप्तीत होणारे घोटाळे , आर्थिक लाभास विलंब होणे, आर्थिक नुकसान होणे, कुमार्गी मित्रांमुळे नुकसान होणे, अशापैकी घटना घडणे संभवते. त्यामुळे काही मंडळींना गहिरे नैराश्य येण्याची शक्यता आहे. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. दररोज स्नान झाल्यावर एकवीस वेळा "ओम गं गणपतये नमः " मंत्राचा जप करा. तसेच "श्रीगणेश अथर्वशीर्षा"चे पठण करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या व्ययस्थानी हर्षलसारखा विक्षिप्त ग्रह असल्याने आर्थिक अडचणी निर्माण होणे, वाईट प्रसंगाला तोंड द्यावे लागणे, जिवावरचे प्रसंग येणे, अकारण शत्रुत्व येणे, काही मंडळींना बेअब्रूच्या प्रसंगाला सामोरे जावे लागणे अशापैकी मनस्ताप देणाऱ्या घटना सहन कराव्या लागण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या धनस्थानी असलेला राहू आर्थिक चिंता निर्माण करण्याची शक्यता आहे. तसेच कौटुंबिक जीवनात कलह निर्माण करीतसे दिसते. महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या रवि -मंगळ या तमोगुणी ग्रहांमुळे असमाधानकारक

घटना घडून कौटुंबिक जीवनातील सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. त्याचा शारीरिक-मानसिक आरोग्यावर परिणाम होणे संभवते. पण महिन्याच्या प्रथम सप्ताहात याच चतुर्थ स्थानी असलेले बुध -शुक्र अनुकुल असल्याने मित्रलाभ होईल व दिलासा मिळेल. तसेच शुक्रामुळे ज्यांची शेतीवाडी आहे त्यांना त्यापासून लाभ होणे संभवते. तसेच सुखसंतोषही लाभेल. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम गेलेल्या बुधामुळे जीवनसाथी व मुलेबाळे यांच्यापासून मनस्ताप होणे संभवते. पण शुक्रामुळे सर्व प्रकारच्या कला-छंद जोपासत असणारांना त्यांच्या गायनवादन, चित्रकला, फोटोग्राफी, भरतकाम विणकाम वगैरे कलाछंदात प्रगती करणे शक्य होईल व समाधान मिळेल. तसेच रवि -मंगळ या तमोगुणी ग्रहांमुळे अनारोग्य, अपघात, संततिसमस्या, स्थावरसंबंधी त्रास, प्रिय जनांपासून होणारा दुरावा अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे या राशीच्या काही विवाहेच्छूना विवाहयोग येईल. ज्यांचे प्रेमसंबंध आहेत ते अधिक घट्ट होतील. काही मंडळींचे नवे स्नेहसंबंध जुळून येतील. काही मंडळींना अर्थलाभ होईल, तर काहींना प्रवासयोग येईल. या राशीच्या ज्या गर्भवती स्त्रियांचा प्रसूतिकाळ या महिन्यात आहे त्यांना पुत्रप्राप्ती होणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी असलेले शनि -केतु प्रतिकुल व अनारोग्यकारक असून असमाधानकारक घटना घडविणारे आहेत. केतुमुळे कौटुंबिक जीवनात कलह, वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. तसेच तो अनारोग्यकारक असल्याने काही मंडळींना रक्तविकार तर काही मंडळींना मुखदन्त रोग, त्वचारोग
अशापैकी आजार होणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या नेपच्यून ग्रहामुळे या राशीच्या स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात अस्थिर परिस्थिती निर्माण होणे संभवते. पण हाच नेपच्यून द्रव पदार्थ व्यापार असणारांना व मानसिक रोग तज्ज्ञाना अनुकुल व लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती प्राप्त होईल. दररोज स्नान झाल्यावर या राशीच्या पुरुषांनी " ओम नम: शिवाय" मंत्राचा व स्त्रियांनी "ओम शिवाय नमः:" मंत्राचा एक माळ जप करावा. तसेच "शिवलीलामृत" स्तोत्राचे पठण करावे.

**(३) मिथुन-** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. काही मंडळींच्या कर्तृत्वाने वरिष्ठ अधिकारी प्रभावित होतील. त्यामुळे काही मंडळींना बढती, काहींना मानाचे स्थान तर क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळणेही संभवते. धैर्य, हिम्मत, महत्त्वाकांक्षा वाढेल. काहींना प्रवासाचे योग्य येतील. पण बुधामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे संभवते; तर राहूमुळे वातविकाराचे आजार होणे संभवते. शिवाय हितशत्रूंचा त्रास होणेही संभवते. पण शुक्र ग्रह अनुकुल असल्याने काही मंडळींना भूमिलाभ तर काहीना धनलाभ होणे संभवते. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि -मंगळ-बुध -शुक्र हे चारही ग्रह या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर परिस्थितीत बदल होईल. रवि -मंगळ प्रतिकुल होतील, तर बुध -शुक्र अनुकुल होतील. रवीमुळे अनारोग्य, कार्य दिरंगाई, वाढता खर्च, अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. तर मंगळामुळे गैरसमज, भांडणतंटे, असमाधानकारक घटना अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. पण बुधामुळे मित्रसुख मिळेल, तर शुक्रामुळे शेतीवाडी असणारांना त्यापासून लाभ होईल. अन्य सुखेही मिळतील. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे आरोग्य सुधारेल व हा गुरु बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना पूरक होईल. या

राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या शनि -केतू ग्रहांमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा ठेवू शकेल. मनस्थिती अस्थिर राहील. ज्यांची कोर्टप्रकरणे चालू आहेत त्यांना अपयश येणे संभवते. शनिमुळे विवाह योग संभवत नाही. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला नेपच्यून ग्रह अध्यात्मिक उपासनेस अनुकुल होईल.

काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील; तर काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. पण या राशीच्या लाभस्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे अपेक्षित लाभाबाबत निश्चित काही सांगता येणार नाही. मित्रांशी भांडणे होण्याची मात्र शक्यता आहे. तसेच काही भाग्यवान मंडळींना अर्थलाभ होण्याची शक्यता मात्र आहे. श्रद्धा असेल कुलदैवताची उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. दररोज स्नान झाल्यावर कुलदैवताचे स्तोत्र पठण करा.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा पूर्वार्ध शारीरिक-मानसिक आरोग्याचे दृष्टीने प्रतिकुल असून आर्थिक चिंता देणारा असण्याची दाट शक्यता आहे. त्यात भर म्हणून आर्थिक नुकसान होणेही संभवते. अनपेक्षितपणे येणाऱ्या आर्थिक जबाबदाऱ्या कशा पूर्ण करावयाच्या याची चिंता त्रस्त करील. रवि -मंगळ दोन्ही उष्ण प्रकृतीचे ग्रह धनस्थानी असल्याने उष्णताविकाराचा आजार त्रस्त करीलसे दिसते. डोळे, मान, घसा यांचे आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. केवळ शुक्र ग्रह अनुकुल असल्याने काही मनोनुकुल घटना घडतील व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. महिन्याच्या उत्तरार्धात रवि-मंगळ -बुध -शुक्र हे चारही ग्रह या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर या राशीच्या नोकरदार मंडळींना काळ अनुकुल होईल व काही मंडळींना बढती, अधिकार पद, काहींना मानाचे स्थान तर क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळणेही संभवते. मंगळामुळे हिंमत, महत्त्वाकांक्षा वाढेल, काहींचे कर्तृत्व सिद्ध होईल. शुक्रामुळे काही मंडळींना भूमिलाभ तर काहीना अर्थलाभ होणे संभवते. काही मंडळींना प्रतिष्ठा प्राप्त होईल. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. पण बुधामुळे मात्र अकारण शत्रुत्व निर्माण होणे, हितशत्रूंपासून त्रास होणे संभवते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी असलेला गुरु या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस अनुकुल होईल. अन्य सर्व सुखे प्राप्त होतील. प्रेमसंबंध असणारांचे प्रेम घट्ट होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेले शनि -केतु या राशीच्या दशम स्थानी असलेल्या हर्षलच्या बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना पूरक होतील त्यामुळे त्या क्षेत्रात कार्यरत असणारांना प्रगती करणे व यश मिळविणे सहज शक्य होईल. तसेच वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारांनाही लाभदायक होतील. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला नेपच्यून विषभय, जलभयकारक असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. तसेच जलप्रवास करू नका व खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या राहूमुळे हितशत्रूपासून रक्षण होईल, काही मंडळींना अर्थलाभ होणे संभवते; तर काहीना परदेशगमनाची संधी मिळेल. पण या राहूमुळे या राशीच्या मंडळींच्या वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते.जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या नोकरी, व्यापार, व्यवसाय असणाऱ्या सर्वांनाच या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. कारण एकूण ग्रहस्थितीचा विचार करता असे दिसते की

केवळ गुरु-शुक्र ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभू शकेल. काही मंडळींची स्थावर खरेदीविक्रीची कामे अपेक्षेनुसार पार पडतील, ज्यांची शेतीवाडी आहे अशांना त्यापासून लाभ होईल व सुखसमाधान लाभेल. पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी ,मनस्ताप दिला जाणे संभवते. जपा. व्यवसायांपैकी ज्यांचा शास्त्रीय संशोधन कार्याशी संबंध आहे केवळ त्यांनाच या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या शनि -केतु-राहू ग्रहांमुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अनारोग्य व अन्य कारणांमुळे अडथळे निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. तसेच अन्य संततिविषयक समस्याही त्रस्त करण्याची शक्यता आहे. तसेच केतूमुळे काही मंडळींना पोटविकार त्रस्त करतीलसे दिसते. पण हा केतू काही प्रमाणात गूढ अभ्यास व आध्यात्मिक उपासनेस अनुकुल होईल. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या राहूमुळे या राशीच्या शासकीय नोकरीतील अधिकारी मंडळींना वाममार्ग धन मिळविण्याचा मोह होईल. पण त्यांनी तो खंबीर मानाने टाळावाच. कारण होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. रवि -मंगळ -बुध हे तीनही पित्त प्रकृतीचे ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्याने उष्णताविकारांचे आजार होणे संभवते. नोकरी-व्यवसायात पीछेहाट होत असल्याचा अनुभव येईल. त्यात आपला स्वभाव मानी, , अहंकारी, हट्टी व मानापमान फार असा असल्यामुळे अकारण श्रम, दगदग व मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. त्यामुळेही मानसिक अनारोग्य होणे शक्य आहे. रक्तदाब, हृदयविकार असे आजार असणारांनी तर प्रयत्नपूर्वक मनावर व विचारशक्तीवर ताबा ठेवून व सहनशील बनून नम्रतेचे आचरण करणेच सुखाचे होईल. त्याशिवाय वाढता खर्च, अनपेक्षितपणे येऊन पडणाऱ्या आर्थिक जबाबदाऱ्या कशा पूर्ण करावयाचा याची चिंता त्रस्त करील. त्याचा शारीरिक आरोग्यावर परिणाम होऊन डोळे, घसा, मान, दाढा यांपैकी कसले तरी अनारोग्य असह्य होणे संभवते. अशा परिस्थितीत बुध ग्रह प्रतिकुल असल्यामूळे चंचल, अस्वस्थ मनस्थिती घडून काही मंडळींना कुसंगतीची बाधा होणे संभवते .जपा. तसेच मित्रद्रोह होणेही संभवते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे वैवाहिक जीवनात संकटे, बाधा येणे संभवते जपा. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे . या राशीच्या काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील; तर काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. श्रद्धा असेल तर आपल्या कुलदैवताची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ घरीदारी सर्व ठिकाणी प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. . रवि - मंगळ -बुध -शनि -केतु -हर्षल वगैरे महत्वाचे ग्रह प्रतिकुल असल्यामुळे या राशीच्या सर्वच मंडळींना आपल्या कौटुंबिक जीवनात व नोकरी-व्यवसायात सतत प्रतिकुल परिस्थितीशी मुकाबला करावा लागेल. सतत मनाविरुद्ध व मनस्तापदायक घटना घडणे,. अपमान होणे संभवते. त्यामुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य होणेही शक्य आहे. तसेच आर्थिक चिंता त्रस्त करतील. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे या राशीच्या काही मंडळींना उगीचच आपल्याला काही तरी मोठा आजार झाल्याची भावना त्रस्त करील. तसेच काही मंडळींना काल्पनिक चिंता त्रस्त करतील. अशा प्रतिकुल काळात मनावर व विचारशक्तीवर ताबा ठेवून, सहनशील बनून सतत नम्रतेचे आचरण केलेत तर तेच सुखाचे होईल व शुक्राच्या अनुकुलतेमुळे मधून मधून ज्या मनोनुकुल घटना घडतील त्यांच्यामुळे दिलासा मिळेल. पण शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना या राशीच्या दशम स्थानी असलेल्या राहूमुळे नोकरीत विविध प्रकारचे लाभ होण्याची शक्यता आहे. . या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या गुरु

ग्रहामुळे या राशीच्या लेखक मंडळींना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल होईल. व काही लेखकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रकाशित होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि -मंगळ -बुध -शुक्र हे चारही ग्रह या राशीच्या प्रथम स्थानी गेल्यावर काळ अधिक प्रतिकुल होईल व त्यामुळे मानहानी, मनस्ताप, असमाधानकारक घटना, आर्थिक चिंता, हाती घेतलेल्या कार्यात बाधा वा अपयश येणे घरीदारी वाद, भांडणे होणे, या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडून त्रास होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. त्याचा परिणाम शारीरिक-मानसिक आरोग्य बिघडण्यात होणे संभवते. जपा. पण शुक्र ग्रहाच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेले शनि -केतू प्रतिकुल असून त्यांच्यामुळे कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येण्याची शक्यता आहे. काहींना मातेच्या अनारोग्याची चिंता त्रस्त करील. काही मंडळींचे घरातील कोणाशी पटणार नाही. त्यामुळे गृहसौख्य लाभणे कठीण होईल व नैराश्य येईल. केतूमुळे विषभय असल्याने बाहेरचे उघडयावरचे पदार्थ खाऊ नका. तसेच या राशीच्या अष्टम स्थानी असलेला हर्षल ग्रह अपघातकारक असल्याने सतत सावधानतेने विचारपूर्वकच आचरण करा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज स्नान झाल्यावर “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. त्यामुळे नोकरीत जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करा. खाजगी नोकरदार मंडळींना मात्र कष्ट-परिश्रम करूनच अपेक्षित अर्थप्राप्ती होईल. काही मंडळींना नवे मित्र मिळतील तर काहींच्या मैत्रीत बाधा येणे संभवते. पण मंगळ ग्रहाच्या अनुकुलतेमुळे मौल्यवान वस्तूचा लाभ होणे संभवते. शुक्र ग्रह संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल असल्यामुळे काही मंडळींना धनलाभ होणे संभवते; तर काहींना ऐषारामाची साधने मिळतील. पण या शुक्रामुळे मानसिक सुखसमाधान व मन:शांती मिळेल एवढे मात्र निश्चित. महिन्याच्या उत्तरार्धात रवि -मंगळ -बुध हे तिन्ही ग्रह प्रतिकुल होणार आहेत. त्यामुळे मनस्थिती अस्वस्थ होणे संभवते. कसली तरी चिंता त्रस्त करील. शिवाय वाद, भांडणे, मानहानी, हाती घेतलेल्या कामात अपयश येणे संभवते. त्याचा परिणाम शाररीक-मानसिक अनारोग्य होणेही संभवते. त्यामुळे मनाची अस्वस्थतता वाढेल. त्यामुळे काही मंडळींना गहिरे नैराश्य येण्याची शक्यता आहे. पण शुक्राच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या हर्षलमुळे जीवनसाथीचे लहरी, विक्षिप्त आचरण, दोघांतील वाद, भांडणे, मतभेद अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा.ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे अशा मंडळींनी कोणत्याही कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे अध्यात्म, गूढ संशोधन यांची मनापासून आवड असणारांना त्यात प्रगती करणे सहज शक्य होईल. या राशीच्या धनस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे कौटुंबिक जीवनात शुभ घटना घडतील, स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात प्रगती होईल. काही मंडळींना उत्तम धनलाभ होणेही शक्य आहे. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे काही मंडळींना अपेक्षित मनपसंत नोकरी किंवा आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण भावण्डविषयक एखादी चिंता त्रस्त करील. श्रद्धा असेल तर श्रीशिव शंकराची उपासना अनुकुल होईल व मन:शांती मिळेल. दररोज

नियमितपणे स्नान करून "शिवलीलामृत" स्तोत्राचे पठण करा. तसेच या राशीच्या पुरुषांनी " ओम नम: शिवाय" मंत्राचा व स्त्रियांनी " ओम शिवाय नमः:" मंत्राचा एक माळ जप करावा.

**वृश्चिक -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल सुखकारक व लाभदायक होईल. पण महिन्याच्या पूर्वार्धात कामाचा ताण सहन करावा लागेलसे दिसते. स्वतंत्र व्यवसाय करत असणारांना मात्र महिन्याचा पूर्वार्ध मंगळ -शुक्र प्रतिकुल असल्यामुळे व्यवसायात अडचणी, अडथळे, मनस्ताप देणाऱ्या खळबळजनक घटना घडणे संभवते. काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करावेसे वाटेल. पण बुध ग्रह अनुकुल असल्यामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल, तसेच नवे मित्र मिळतील. महिन्याच्या उत्तरार्धात शुक्र ग्रहही अनुकूल होईल व सर्व काही मनासारखे घडेल. खाजगी नोकरी असणारांना मात्र महिन्याचा उत्तरार्ध कष्टदायक असल्याचाच अनुभव येईल. तसेच काही कारणाने मैत्रीत वितुष्ट येणे संभवते. जपा. काही भाग्यवान मंडळींना मौल्यवान वस्तूचा लाभ होणे संभवते. या राशीच्या प्रथम स्थानी असलेला गुरु ग्रह बौद्धिक व शास्त्रीय संशीधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या धनस्थानी असलेल्या शनि -केतू ग्रहांमुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील, तसेच कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेला नेपच्यून घरगुती जीवनात गैरसमज निर्माण करून गृहसौख्यात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. जपा, या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना पूरक होईल; पण सतत खोल विचार करणारांना डोकेदुखीचा किंवा मेंदूविकाराचा आजार त्रस्त करील जपा. काही मंडळींना मुदतीचा ताप येणे संभवते. या राशीच्या ज्या मंडळींच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे त्यांना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा धनलाभ होईल. शनि ग्रहाच्या साडेसातीचा केवळ चारपाच महिन्यांचा काळच शिल्लक असल्याने
सतत मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण केल्यास सर्व सुखाचेच घडेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना मनशक्ती व मनशांती देईल. दररोज स्नान झाल्यावर " ओम गं गणपतये नम: " मंत्राचा एकवीस वेळा जप करा. तसेच "श्रीहनुमानचालिसा " स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींना या संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल व मनस्ताप देणारा असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या प्रथम स्थानी असलेला शनि आरोग्यविघातक असून स्वतः:चे व जीवनसाथीचे आरोग्य बिघडण्याची शक्यता दिसते. जपा. पण तेथेच असणाऱ्या केतुमुळे सुखसमाधान लाभेल. पण हा केतू वाहन अपघात दर्शवितो.. त्यामुळे वाहन सतत सावधानतेने व नियंत्रित वेगानेच चालवा. सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अतिशय भावनाशील झाली असणे संभवते. त्यामुळे अध्यात्मात रस असणारांना.उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे सहज शक्य होईल. तसेच गूढविद्या संशोधनात प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. या राशीच्या काही मंडळींना
जलप्रवासाची तर काहींना परदेशगमनाची संधी मिळण्याची शक्यता दिसते. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या हर्षलमुळे उच्च बौद्धिक संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना प्रगती करणे व यश मिळविणे

सहज शक्य होईल. काही भाग्यवंत मंडळींना अंतर्ज्ञान प्राप्त होईल; तर कलाकारांना कलेत प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच काही मंडळींच्या मनात कपटी विचार घर करतील. जपा. वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह टाळाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. या राशीच्या मंडळींना महिन्याचा पूर्वार्ध प्रतिकुल असून या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत कामाचा ताण, विरोध मानहानी सहन करावी लागणे संभवते. शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात मनस्ताप मानहानी होणे संभवते. बुधामुळे होणाऱ्या कामात दिरंगाई होणे, अडचणी येणे, वाद भांडणे होणे संभवते. जपा. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. महिन्याचा उत्तरार्ध या राशीच्या नोकरदार मंडळींना अनुकुल होईल व विविध प्रकारे लाभ होतील. पण स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. त्यामुळे काहींना हातचे सोडून नवीन काही करावेसे वाटेल. पण त्यांनी तसे करू नये. यांत्रिक तांत्रिक व्यवसाय व औषध विक्रेते यांना काळ बरा जाईल. बुधामुळे मानसिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. व्यय स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे अध्यात्म व समाजकार्य यात गोडी असणारांना प्रगती करणे शक्य होईल. पण हा गुरु कौटुंबिक सुखात बाधा आणेल. प्रवासात अडचणी निर्माण करील. जपा. श्रद्धा असेल शिवोपासना करा. तसेच “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे व हनुमानचालीसा स्तोत्राचे पठण करा.

**(१०) मकर -** या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींचा स्वभाव अत्यंत लहरी, चंचल असा घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे उतावळेपणाने व अविचाराने नको ते घडण्याची शक्यता आहे. जपा.

मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आणि सध्या व्ययस्थानी असलेला शनि मानहानी व मनस्ताप देणाऱ्या घटना घडविण्याची शक्यता आहे. आर्थिक व्यवहार विचारपूर्वक व सावधानतेनेच करा. या राशीच्या धनस्थानी असलेला नेपच्यूनही आर्थिक चिंता व समस्या निर्माण करण्याची शक्यता दिसते. जपा. चतुर्थ स्थानी असलेल्या हर्षलमुळे घरात कोणाशी पटणार नाही. वास्तुसुख लाभणार नाही. सतत तक्रारी करत बसाल व कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा निर्माण कराल. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या राहूमुळे ज्यांचा अन्य जातिधर्माच्या लोकांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना लाभदायक होईल. पण हा राहू काही मंडळींना पोटाच्या आजाराने त्रस्त करीतसे दिसते. विषभय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राहूमुळे हितशत्रू पराभूत होतील. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. नोकरीत कामाचा ताण , मानहानी सहन करावी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे शारीरिक अनारोग्य होणेही संभवते. मंगळामुळे जलभय, वीजभय आहे. त्यामुळे विजेवर चालणारी उपकरणे जपून वापरा. तसेच खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका.. काही मंडळींना उष्णताविकार बळावून मूळव्याधीसारखा आजार त्रस्त करीतसे वाटते. शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात त्रास, मानहानी होणे संभवते. अशा परिस्थितीत बुध - गुरु --शुक्र च्या अनुकुलतेमुळे कौटम्बिक सुख, काहींना अचानक धनलाभ किंवा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. काहींना कीर्ती , प्रसिद्धी मिळणेही शक्य आहे. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या गुरु ग्रहांमुळे विवाहेच्छूचे विवाह ठरतील व संपन्न होतील. विद्यार्थी शैक्षणिक प्रगती करू शकतील. इच्छाआकांक्षा पूर्ण होतील., वाहनसुख मिळेल. श्रद्धा असेल तर शिवोपासना करा. पुरुषानी “ओम नम: शिवाय” मंत्राचा व स्त्रियांनी “ओम शिवाय

नमः:" मंराचा एक माळ जप करावा. तसेच दररोज नियमितपणे "शिवलीलामृत" स्तोत्राचे व "हनुमानचलीसा" स्तोत्राचे पठण करावे.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अतिशय कोमल झाली असावी असे वाटते. तसे असेल तर मानसिक संवेदनाही चटकन दिसून येत असतील. त्यामुळे चटकन उदासीनता येऊन
गहिरे नैराश्य येत असावे. पण या राशीच्या तृतीय स्थानी असलेला हर्षल उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल व आकलन शक्ती, स्मरणशक्ती देईल. काही मंडळींना परदेशगमनाची संधीही प्राप्त होईल. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या राहूमुळे कमिशन, दलाली व्यवसाय असणारांना भरघोस लाभ होईल; पण हा राहू संततिसुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या सप्तम स्थानी असलेले रवि -मंगळ -बुध अनारोग्यकारक असून स्वतः:च्या व जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे, दोघांतही वाद, मतभेद आदि कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करतील जपा. पण याच स्थानी असलेल्या शुक्र ग्रहामुळे जीवनसाथी कलाकार असल्यास काही प्रमाणात वैवाहिक सुख मिळेल. प्रेमिकांचे प्रेमविवाह होणेही शक्य आहे. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी संशय , गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. महिन्याचा उत्तरार्ध या राशीच्या नोकरदार मंडळींना प्रतिकुल होईल व मंगळ ग्रहामुळे उष्णता विकाराचे आजार त्रस्त करतील. अति तिखट पदार्थ खाण्याची आवड असणाऱ्या काहींना मूळव्याधीसारखे आजार होणे संभवते. पाणी, वीज यांपासून धोका आहे. जपा. सतत सावधानतेने चाला. अपघात भय असून हाडमोड होणे संभवते. पण बुध -शुक्र अनुकुल असून काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षित अर्थप्राप्ती होईल. जन्मकुंडलीत योग असेल तर काही मंडळींना अचानक धनलाभ किंवा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी असलेला गुरु बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. वरिष्ठ कामाचे कौतुक करतील. काही मंडळींना नवे कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे संततीस त्रास होणे संभवते. केतुमुळे प्रवासयोग येईल. श्रद्धा असेल तर पुरुषांनी "ओम नम: शिवाय" मंत्राचा व स्त्रियांनी " ओम शिवाय नमः:" मंत्राचा एक माळ जप करावा. तसेच " शिवलीलामृत " स्तोत्राचे व " हनुमानचालीसा " स्तोत्राचे दररोज नियमितपणे पठण करा.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळींची मनस्थिती सध्या अत्यंत कोमल झाली असल्यास मानसिक संवेदनाही अति जलद होत असतील. त्यामुळे नैराश्यही येत असावे. शिवाय या राशीच्या वाचा स्थानी हर्षलसारखा विक्षिप्त ग्रह असल्यामुळे विचारशक्ती अति अस्थिर व अविचारी झाली असण्याची शक्यता आहे. त्यामुळे अविचाराने खर्च होणे, विचित्र आचरण होणे, आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्या व्यक्तीचा नकळत अपमान होणे अशा घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेली राहूमुळे कौटुंबिक जीवनात त्रास, कटकटी, अनिष्ट घटना घडणे संभवते. या राशीच्या षष्ठ -सप्तम स्थानी असलेला रवि ग्रह सर्व नोकरदार मंडळींना अनुकुल, पूरक होईल; पण काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. मंगळ ग्रह पूर्णपणे प्रतिकुल

असून अनारोग्यकारक होईल. इजा होणे ,फोड येणे, ताप येणे, अपप्रचाराचा त्रास होणे, काहींना हृदयविकार होणे, अशाअपेकी घटना घडण्याची शक्यता आहे. तसेच चोरी होणेही संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात जीवनसाथीचे अनारोग्य, दोघांतही वाद, गैरसमज, न पटणे अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. बुध ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकूल होईल; पण उत्तरार्धात मनस्ताप देईल. महिन्याच्या पूर्वार्धात शुक्र ग्रह प्रतिकुल होईल. त्यामुळे उच्च गुणवत्ता असूनही कर्तृत्व सिद्ध करण्याची संधीच मिळणार नाही. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा शुक्र वैवाहिक जीवनात सुखसमाधान देईल. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. उत्कर्ष होईल. प्रवासाची संधी मिळेल. या राशीच्या दशम स्थानी असलेलया शनि - केतु ग्रहांपैकी शनि ग्रह कोळसा, लोखंड, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय यांना अनुकुल व लाभदायक होईल; पण केतुमुमुळे काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी तसे काही करू नये. आहे ती नोकरीच करावी. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

=====ooooo0ooooo=====